इ./म.आवक क्र. ८८७ /२०२६
दाखल तारीख : ०६।५।२०२६

सहा.अधिक्षक, पेठ वडगाव.

Exh. 6/C

# महाराष्ट्र शासन

## निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,भरारी पथक क्र.1 कोल्हापूर यांचे कार्यालय


जुनी दारु भटटी, रंकाळा टॉवर, कोल्हापूर -४१६०१२
दुरध्वनी क्रमांक- फोन-.नं.९८२२७०३९३९,
ई-मेल क्रमांक - ipstateexcisefskop@gmail.com


डिईटी/११२०२६/२१२/निरी.भ.प.क्र.१, कोल्हापूर.

दिनांक;- ३०/०४/२०२६.

प्रति,

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो,
पेठ वडगाव, ता.हातकणंगले,
जि.कोल्हापूर.

यांना सविनय सादर....

(मार्फत:मा.सरकारी अभियोक्ता, मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो पेठ वडगाव,
ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर.)

Order
Seen
Sd/-
JMFC
02/07/2026

विषय: किरकोळ क्रिमिनल अर्ज नं.६१/२०२६ दि.०४/०३/२०२५ व गुन्हा र. क्र.३७७/२०२५ मधील म्हणणे देणेबाबत...

संदर्भ: जावक क्र १३२७/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगाव. दिनांक – १३/०४/२०२६.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास सविनय सादर करण्यात येते की, या कार्यालयाने दिनांक २९/११/२०२५ रोजी आळते, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, या गावच्या हद्दीत हॉटेल नुरच्यासमोर येथे आरोपी क्र.1. मुसा अब्दुलरजाक जमादार व.व.36, रा. शिवाजीनगर कोरोची, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, 2. राहुल अशोक लोहार व.व.21, रा. शिवाजीनगर कोरोची, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर आरोपी क्र.३ संतोष विलास खाडे व.व.28, सध्या रा.शिवाजीनगर कोरोची, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, मुळ पत्ता- हरगापूरगड हरगापूर बेलर्गी, ता.हुक्केरी, जि.बेळगाव व आरोपी क्र.४ रविराज विनायक कोठावळे व.व.25, रा.मजले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यास बेकायदा विनापरवाना बनावट अवैध मद्य विक्रीकरिता वाहतुक करीता आयात केलेला साठा जप्त केला. त्यामुळे सदर आरोपीत इसमावर महराष्ट्र दारूबंदी अधि. १९४९ चे कलम ६५ (a),(e),(f) ८०,८१,८३, ९० व १०८ प्रमाणे गुन्हा र. क्र. ३७७/२०२५ नोंद केला आहे. सदर गुन्ह्यामध्ये अवैध मद्यासह एक जुना वापरता SAMSUNG कंपनीचा S25 Ultra मोबाईल संच असे या कार्यालयाने वरील आरोपींसह वाहन, वरील वर्णन केलेले एक मोबाईल संच व अवैध मद्य साठा जप्त केला आहे. सदरचे मोबाईल संच परत देणेसंदर्भात अटी व कारणे खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहेत.

१. सदरचे मोवाईल संच परत केल्यास सदर मोबाईल संचांचा वापर पुन्हा अशाच प्रकारे बेकायदा विनापरवाना बनावट अवैध मद्य विक्रीकरिता करण्यासाठी होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.
२. सदरचे मोवाईल संच हे या कार्यालयामध्ये सुरक्षित आहेत.

३. त्याच प्रमाणे महोदयांना विनंती करण्यात येते की, जर उपरोक्त जप्त मोबाईल सोडण्याचे आदेश देण्यात आले तर मा. उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांनी क्रिमिनल रिव्हीजन ॲप्लीकेशन नं.६७०,६७१/२०२,१०१९/२००२ मध्ये दिनांक १७/०८/२००२ रोजी दिलेल्या निर्णयाचे कृपया अवलोकन होण्यास विनंती आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, जप्त झालेल्या मोबाईल सोडण्याचा संदर्भात काही तत्वे नियम अटी ठरविलेल्या आहेत त्यामुळे या प्रकरणात जर मोबाईल सोडायचे असेल तर त्या त्या अटीचा विचार व्हावा ही नम्रविनंती.

अ) सदर मोबाईलबाबत मा.न्यायालयास या गुन्हयाच्या निर्णयावेळी एक जुना वापरता SAMSUNG कंपनीचा S25 Ultra मोबाईल शासन जमा करणे ऐवजी अर्जदारास देणे योग्य होईल असे वाटत असेल तर त्यावेळी योग्य सुरक्षा रक्कम महत्वाची असेल त्यामुळे सदर सुरक्षा रक्कम / ठेव खालील प्रमाणे ठरीवणे योग्य होईल.

ब) सर्व प्रथम सदर जप्त मोबाईलची म्हणजेच एक जुना वापरता SAMSUNG कंपनीचा S25 Ultraया मॉडेलची बाजारभाव किंमत ठरवावी तसेच त्यावर ३% दरवर्षी घसारा
रक्कम वजा करावी.

क) कोणत्याही परिस्थितीत सदर जप्त केलेल्या मोबाईलची किंमत ही न्यु ब्रॅड किंमतीच्या मुल्यापेक्षा ५०% कमी असु नये.

ड) अशा रितीने जप्त करण्यात आलेल्या एक जुना वापरता SAMSUNG कंपनीचा S25 Ultra मोबाईल मॉडलेच्या किंमती ठरविण्यात आलेल्या रक्कमेच्या ५०% बॅक गॅरंटी स्वरूपात मा.न्यायालयात दयावी, सदर रक्कम व बॅक गॅरंटी गुन्हयाच्या निकाल लागेपर्यंत वैध राहिल.

सदर अर्जदार हा सदरच्या गुन्हयांत सहआरोपी असल्यामुळे सदरचे मोबाईल संच परत केल्यास सदर मोबाईल संचांचा वापर पुन्हा अशाच प्रकारे बेकायदा मद्याची वाहतुक करणेकामी तसेच संपर्ककामी होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. तरी कृपया वरील कारणास्तव जप्त करण्यात आलेले अर्जदाराचे मोबाईल संच अर्जदारास परत न करण्यात यावे असे या कार्यालयाचे म्हणणे आहे.

मे.जा.व्हावे.

आपला विश्वासू.

(एस.एम.मस्करे)
निरीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क,
भरारी पथक क्र.१, कोल्हापूर.